// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //


Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

ISSN 2277-5730

# AJANTA



मराठी भाग - १

भारतातली पहिली महिला शिक्षिका

## "सावित्रीबाई फुले"

Special Issue
"WOMEN EMPOWERMENT"

VOLUME - VII, ISSUE - I
JANUARY - MARCH - 2018
IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 5.2 www.sjifactor.com

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# मराठी अणुक्रमणिका



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | स्त्रियांचे सर्वांगिण आरोग्य आणि मातामृत्यू, कुपोषण आणि मानसिक आजार<br>**श्वेतांबरी कनकदंडे** | ६९-७४ |
| १५ | जालना जिल्ह्यातील महिलांच्या सक्षमीकरणात बचत गटाचे योगदान<br>**प्रा. डॉ. पल्लवी एस. भावसार** | ७५-७८ |
| १६ | महिला सक्षमीकरणासाठी शासनाने राबविलेल्या विविध योजनांचा आढावा<br>**डॉ. दिपक व्ही. भुसारे**<br>**जयश्री आसाराम तळेकर** | ७९-८५ |
| १७ | कौटिल्य आणि महिला सक्षमीकरण: गणिकांच्या संदर्भात<br>**प्रा. पंकजा माधव वाघमारे** | ८६-८८ |
| १८ | स्त्री आरोग्य आणि पोषणदर्जा<br>**प्रा. श्रीमती माधुरी उत्तमराव थोटे (निर्वे)** | ८९-९२ |
| १९ | महिला सबलीकरणात कायद्याची भुमिका<br>**डॉ. लोखंडे बी. भी.** | ९३-९८ |
| २० | महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब वामनराव सोनवणे** | ९९-१०३ |
| २१ | वर्तमानकालीन महाराष्ट्रातील स्त्रीची भुमिका व आव्हाने<br>**प्रा. कांबळे रावसाहेब हरीबा** | १०४-१०८ |
| २२ | महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराचा एक चिकित्सक अभ्यास<br>**श्री. वसंत संसारे** | १०९-११२ |
| २३ | महिला सबलीकरणासाठी करण्यात आलेले ठराव आणि कायदे<br>**प्रा. खरात सतिश कुंडलिकराव** | ११३-११६ |
| २४ | स्वच्छतेबाबत लिंगभावात्मक दृष्टिकोनातून सरकारची भूमिका<br>**मंजुषा शरदकुमार माळवतकर** | ११७-१२१ |
| २५ | महाराष्ट्रातील महिलांच्या राजकीय, आरोग्य, शैक्षणिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. गजानन रामराव हनवते** | १२२-१२५ |
| २६ | महिला सक्षमीकरण व भारतीय संविधान : वास्तविकता<br>**सुनिल दामोधर भारोडकर** | १२६-१३१ |
| २७ | महिला उद्योजकता<br>**गायत्री उमेश मोटे** | १३२-१३५ |





Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# १७. कौटिल्य आणि महिला सक्षमीकरण : गणिकांच्या संदर्भात

प्रा.पंकजा माधव वाघमारे
सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

स्त्रियांची पूजा किंवा सत्कार यांना दैवी गुण मानणा-या भारतीय समाजामध्ये स्त्रीला खूप काळपर्यंत अनादर आणि उपेक्षा सहन करावी लागली. शिक्षण आणि स्वावलंबन या दोन गोष्टींमुळे स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा होतांना दिसते आहे. अत्यंत प्राचीन अशा भारतीय संस्कृतीत स्त्रियांचा दर्जा हा नेहमीच दुय्यम होता का ? भारतीय समाजाने कायम 'स्त्री' ची हेटळणी केली का ? अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली ज्यामुळे स्त्रियांना आपल्या हक्काकरीता लढा द्यावा लागला या सर्व प्रश्नांचा विचार केल्यावर प्राचीन भारतातील स्त्रियांच्या स्थितीचे अवलोकन करणे अपरिहार्य ठरते.

भारतामध्ये 'स्त्री' आणि 'पुरुष' यांना समाजरथाची दोन चाकं समजलं जातं. त्यामुळेच प्राचीन काळात समाजात स्त्रियांविषयी नितांत आदर होता असे दिसून येते.

यस्यां भूतं समभवत् यस्यां विश्वमिदं जगत् ।
तामद्य गाथां गास्यामि स्त्रीणां यदुत्तमं यश इति ॥

(१.७.२ पारस्कर गृह्यसूत्रम्- डॉ.जगदीशचन्द्र मिश्र)

प्राचीन काळी जर समाजामध्ये स्त्रियांचे स्थान मानाचे होते तर स्त्री ची दयनीय अवस्थादेखील तेव्हा होती का ? वास्तविकतेचा विचार केला तर काळानुरूप परिस्थितीमध्ये जे परिवर्तन होते त्यामुळे सामाजिक मूल्यदेखील बदलत जातात. कदाचित हेच कारण असावे की स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर या सर्व परिवर्तनांचा आणि शेकडो वर्ष झालेल्या परकीय आक्रमणांचादेखील प्रभाव पडला असावा.

सुमारे २३०० वर्षांपूर्वी राजनीतीचे सांगोपांग विवेचन करणा-या 'कौटिलीयम् अर्थशास्त्रम्' नावाच्या एका ग्रंथाची रचना विष्णुगुप्ताने म्हणजेच कौटिल्याने केली. राजनीतीचे शास्त्र सांगत असतांनाच त्याने अनेक महत्त्वाच्या विषयावर असे विवेचन केले आहे जे आजच्या काळातदेखील उपयुक्त आहे. कौटिल्याच्या काळातील भारत म्हणजे सामन्तवादाच्या अभ्युत्थानाचे युग आहे. यांमध्ये स्त्रियांचे स्वातंत्र्य अबाधित राहू शकले नाही जसे ते मातृसत्ताक युगात किंवा वैदिक काळामध्ये होते. जसाजसा सामन्तवादाचा विकास होत गेला तसा संपूर्ण स्त्री-समाज भयानक प्रतिबंध आणि नियंत्रणामध्ये बांधला गेला. जरी कौटिल्य व्यक्तिगतरुपाने स्त्रियांबद्दल अत्यंत सहानुभूती असणारा होत तरी एका व्यक्तीचा विरोध समाजव्यवस्थेच्या अनिवार्य नियमांना विरोध करु शकत नाही मग तो कौटिल्यासारखा एका महान साम्राज्याचा संस्थापक असला तरीही !

जरी असे असले तरी देखील कौटिल्याने अर्थशास्त्रात ठिकठिकाणी स्त्रियांबद्दलची त्याची उदारमतवादी भूमिका प्रदर्शित केलेली दिसते. कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ काही साकल्याने 'स्त्री' चा विचार करणारा ग्रंथ नाही. त्यामुळे विषयाच्या

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ओघात तो स्त्रीविषयक जी मते मांडतो त्यावरुन त्याचा स्त्रीविषयीचा विचार हा प्रचलित व्यवस्थेला छेद देणारा वाटतो. कौटिल्याने ठिकठिकाणी स्त्रीविषयक विचार एवढ्या परखडपणे मांडले आहेत की सध्याच्या काळातही त्याच्या विचारांचे महत्व अबाधित राहिले आहे असे म्हणता येईल.

स्त्रियांचा सन्मानपूर्वक विचार करणारा कौटिल्य हा एक परखड स्त्रीवादी विचारवंत होता. स्त्रियांचा सामाजिक दर्जा वेळोवेळी उद्धृत करत असतांना त्याने स्त्रियांच्या सक्षमीकरणावर भर दिलेला दिसून येतो. समाजातील अत्यंत हीन घटक समजल्या जाणा-या गणिकेचा गणिकाध्यक्ष प्रकरणात त्याने साकल्याने विचार अत्यंत प्रगल्भपणे मांडला आहे.[१]

इच्छा नसलेल्या कुमारीवर बळाचा वापर केल्यास उत्तम साहसदंड करावा असे तो सांगतो. समाताजातील तथाकथित हीन दर्जा असलेल्या गणिकेच्या संमतीचादेखील तो विचार करतो. त्याच प्रमाणे गणिका असली तरी कुमारिकेवर केला जाणारा अन्याय त्याला मान्य नाही म्हणूनच अशा व्यक्तीला तो साहसदंड सुनावतो. गणिकांचा देखील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार करणारा हा कौटिल्य पुढे म्हणतो.[२]

गणिकेच्या इच्छेविरुद्ध तिला कोंडून ठेवणा-यास अथवा तिला पळवून नेणा-यास अथवा जखम करुन तिला विद्रूप करणा-यास एक हजार पण दंड करावा.

म्हणजेच स्त्री वरील कोणताही अत्याचार कौटिल्याला मान्य नव्हता गणिका असली तरी तिच्या इच्छेला प्राधान्य द्यावे असा कौटिल्याचा विचार होता म्हणूनच तो गणिकेवर अत्याचार करण्यास एक हजार पण दंड सुनावतो. पुढे तो म्हणतो.

अधिकारावर नेमणूक झालेल्या गणिकेस ठार मारणा-यास त्या रकमेच्या तिप्पट (बहात्तर हजार पण) दंड करावा गणिकेची माता किंवा मुलगी किंवा रुपदासी यांना मारल्यास उत्तम साहसदंड करावा.[३,४]

याचाच अर्थ गणिका हीन आहे, त्याज्य आहे किंवा केवळ उपभोग्य आहे असा कोणताही विचार तो करत नाही तर गणिकेवर अत्याचार करणा-यास तो कठोर दंड सुनावतो म्हणजेच तो गणिकेकडे केवळ एक स्त्री म्हणून न पाहता एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून किंवा समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून पाहतो असे म्हणता येईल.

गणिकेचे अलंकार, द्रव्य अथवा उपभोगाची रक्कम यांचे अपहरण करणा-यास आठपट दंड करावा.[५]

गणिकेच्या द्रव्याचा अपहार करणा-यास कौटिल्य आठपट दंडाची शिक्षा सुनावतो. यावरुन तो न्यायप्रक्रियेमध्ये सर्वांना समान न्याय देणारा एक कायदेपंडित होता हे लक्षात येते.

गणिकाध्यक्ष प्रकरणात त्याने गणिकांविषयी जे नमूद केले आहे त्यावरुन कुठेही स्त्री विषयीच्या हीन भावनांना थारा त्याने दिलेला नाही हे लक्षात येते. गणिकेचा एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार करणारा कौटिल्य याही पुढे जाऊन एक अत्यंत महत्त्वाचा विचार मांडतो.

गणिका आणि रंगभुमीवर उपजीविका करणा-या दासी यांना त्या कलांचे ज्ञान करुन देणा-या शिक्षकांच्या उपजीविकेची सोय सरकारी तिजोरीतून करुन द्यावी.

गणिका ही प्रजेच्या रंजनासाठी आहे याची जाणीव कौटिल्याला होती त्यामुळे तिला सर्व कलांमध्ये निपुण करणा-या प्रशिक्षकाच्या वेतनाची रक्कम सरकारी तिजोरीतून प्रदान करण्यात यावी असे तो नमूद करतो.[६]

प्रशिक्षणकाळात गणिका त्याला वेतन देऊ शकणार नाही त्यामुळे ही जबाबदारी शासनाने उचलावी असा विचार त्याने मांडलेला आहे. त्याच्या या विचाराचे, मताचे पुनरवलोकन होणे आज गरजेचे आहे असे वाटते.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

गणिकांचा देखील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून विचार करणारा कौटिल्य होता. गणिकांना प्रजेचा एक घटक म्हणून स्वीकारुन त्यांच्या हितसंबंधांच्या आड येणा-या गोष्टींना तो प्रतिबंध करतो. गणिकाध्यक्ष प्रकरणातील कौटिल्याचे विवेचन हे त्याच्या स्त्रीविषयक विचारांचा एक उत्कृष्ट नमुना आहेत. समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून शासन संस्थेने गणिकांना दिलेल संरक्षण ही जमेची बाजू होती. गणिका जर व्यवसाय सोडून जाऊ इच्छित असेल तर तिने चोवीस हजार पण रक्कम दिल्यास ती हा व्यवसाय सोडू शकत असे.[७] गणिकेचा व्यवसाय करणे कोणत्याही स्त्रीवर बंधनकारक नव्हते.

गणिकेचे सौंदर्य नष्ट झाले म्हणजे तिला मातृका करावी, तसेच गणिकेची दासी उपभोगास निरुपयोगी झाली. म्हणजे तिने कोठा रात अथवा ुदपाकखान्यात काम करावे.[८]

गणिका वृद्ध झाली म्हणजे तिच्या उपजीविकेचा विचार देखील राजाने केला पाहिजे असे सांगून कौटिल्य राजाने तिला मुदपाकखान्यात किंवा कोठारात काम द्यावे असेही सुचवतो. आजच्या काळातदेखील मार्गदर्शक असा कौटिल्याचा हा विचार आहे.

**'मृच्छकटिकम्'** या प्रकरणामध्ये वसंतसेनेचा पाठलाग करणारा विट वसंतसेनेला म्हणतो- **'त्वं'** वापीव लतेव नौरिव जनं वेश्यासि सर्व भज ।'[९] यावरुन वेश्येचे समाजातील स्थान आणि तिची सर्वोपभोग्यता लक्षात येते. तिने सर्वच लोकांची सेवा केली पाहिजे, तिच्या मर्जीत काय आहे ते तेवढे महत्वाचे नाही असेच जणू विट तिला सुचवू पाहतो. मृच्छकटिकम् हे तर एक प्रातिनिधिक उदाहरण झाले पण सगळ्याच काळामध्ये वेश्येचा सामाजिक दर्जा हा थोड्याफार फरकाने सारखाच असल्याचे दिसून येते. गणिकेला, वेश्येला मर्जी असते हेच लोकांना मुळात मान्य नाही. कौटिल्याने इच्छा नसलेल्या गणिकेवर बळाचा वापर करणारास उत्तम साहसदंडाची शिक्षा सुनावली आहे. समाजातील तथाकथित हीन दर्जा असलेल्या गणिकेच्या संमतीचा, मर्जीचा विचार करणारा कौटिल्य हा एकमेव शास्त्रकार असावा.

गणिकाध्यक्ष प्रकरणात कौटिल्याने गणिकांविषयी जे प्रतिपादन केले आहे त्याकडे दृष्टिपेक्ष टाकल्यास गणिकांच्या सामाजिक स्थितीचा अंदाज येतो. गणिकांना राजाश्रय देणारा कौटिल्य त्यांना स्वातंत्र्य आणि संरक्षण त्याचप्रमाणे अर्थसंपादनाचा त्यांच्या मर्जीनुसार असलेला अधिकार प्रदान करतो तेव्हा कौटिल्य हा महिला सक्षमीकरणाचा पुरस्कर्ता होता असे प्रकर्षाने जाणवते.

**संदर्भ-**

१) अकामाया : कुमार्या वा साहसे उत्तमो दण्ड : २.२७.१३ कौ.अ.
२) गणिकामकामां रुन्धतो निष्पातयतो श्रणविदारणेन वा रुपमुपघ्नत : सहस्रं दण्ड : .अ.
३) प्राप्ताधिकारां गणिकां घातयतो निष्क्रय त्रिगुणो दण्ड: (२.२७.१६) कौ.अ.
४) मातृकादुहितृकारुपदासीनां घाते उत्तम: (२.२७.१७) कौ.अ.
५) गणिकाभरणमर्यं भोगं वापहरतो $ष्टगुणो दण्ड: (२.२७.२३) कौ.अ.
६) गणिका दासी रङ्गोपजीविनीश्च ग्राहयतो राजमण्डलादाजीवं कुर्यात्| (२.२७.२८)
७) निष्क्रयच्चतुर्विशतिसाहस्रो गणिकाया:, द्वादशसाहस्रो गणिकापुत्रस्य (कौ.अ.२२७.६)
४) गणिकादासी भन्नभोगा कोष्ठागारे महानसे वा कर्म कुर्यात् । (कौ.अ. २.२७.८) मृच्छकटिकम् (१.३२)

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad